# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १८८ वा ❑ शुक्रवार दि.१२ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## यलो वेस्ट नंतर आता फ्रान्स मध्ये ब्लॉक एव्हरीथिंग

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

जगातील ५ सर्वात शक्तिशाली देशांपैकी एक असलेल्या फ्रान्समध्ये जे घडत आहे ते नेपाळपेक्षा मोठे असल्याचे दिसून येत आहे. फ्रान्सला सामान्यतः युरोपमधील शांतताप्रिय देशांपैकी एक मानले जाते. त्याला कला आणि संस्कृतीची राजधानी देखील म्हटले जाते. पण असे काय कारण आहे ज्यामुळे फ्रान्स पुन्हा एकदा युरोपची क्रांती राजधानी बनण्याच्या मार्गावर आहे? हो, फ्रान्सच्या मातीतून उद्भवलेल्या तीन क्रांतींनी जगाला सत्ता आणि लोकशाहीचा धडा शिकवला आहे, एक रोड मॅप दिला आहे. तर १८ व्या आणि १९ व्या शतकात घडलेल्या फ्रान्समध्येही तेच घडणार आहे का...?

नेपाळमध्ये सध्या भयानक गोंधळ सुरू आहे. जनतेने भ्रष्टाचाराविरुद्ध गोंधळ निर्माण केला, ज्यामुळे सरकार कोसळले. केपी शर्मा ओली यांना राजीनामा द्यावा लागला. नेपाळमधील निर्दर्शनांनंतर दुसऱ्या देशात गोंधळ सुरू आहे. या देशाचे नाव फ्रान्स आहे. फ्रान्स सध्या रस्त्यावर गोंधळ आणि संसदेत अस्थिरता या दोन्हींशी झुंजत आहे. बुधवारी सकाळी राजधानी पॅरिस आणि अनेक मोठ्या शहरांमध्ये पोलिस आणि निदर्शकांमध्ये जोरदार चकमक झाली. ब्लॉक एव्हरीथिंग या नावाने सुरू झालेल्या या मोहिमेमुळे संपूर्ण देशातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. केवळ पॅरिसमध्ये २०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली.या आधी फ्रान्स मध्ये यलो वेस्ट आंदोलनाने मॅक्रॉनला सरकारला जेरीस आणले होते आता परत आंदोलकांनी मॅक्रॉन विरोधात वेढा घातला आहे.

निदर्शकांनी रेल्वे आणि रस्ते वाहतूकच रोखले नाहीत तर तेल डेपो, सुपरमार्केट आणि पेट्रोल पंपांनाही लक्ष्य केले. सोशल मीडियावरील काही गटांनी लोकांना दुकाने लुटण्याचे आवाहनही केले. ही नवीन चळवळ फ्रान्सच्या कुप्रसिद्ध यलो वेस्ट चळवळीची आठवण करून देते, ज्याने काही वर्षांपूर्वी मॅक्रॉनला त्यांचे धोरण बदलण्यास भाग पाडले होते.

परत एकदा राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या धोरणांविरुद्ध लोक रस्त्यावर उतरले आहेत, ज्यामुळे पॅरिसमध्ये जाळपोळ आणि पोलिसांवर दगडफेक झाली आहे. निदर्शकांचे म्हणणे आहे की मॅक्रॉन सरकार लोकांचे जीवनमान सुधारण्यात अपयशी ठरले आहे. मॅक्रॉनवर राजीनामा देण्यासाठी दबाव वाढत आहे.

लोकांचे म्हणणे आहे की मॅक्रॉन सरकारने लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी एकही काम केले नाही. त्यांचे आर्थिक व्यवस्थापन देखील खूपच खराब राहिले आहे. फ्रान्समधील या निदर्शनांची सुरुवात सोशल मीडियावर सर्वकाही ब्लॉक करा या आवाहनाने झाली. यानंतर, सोशल मीडियाद्वारे पॅरिसमध्ये हिंसाचार उसळला.

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पंतप्रधानपदासाठी आपला नवीन उमेदवार जाहीर केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी फ्रान्समध्ये दंगली आणि अशांतता पसरली आहे. मॅक्रॉनवर त्यांच्या पदाचा राजीनामा देण्यासाठी दबाव वाढत असताना, पॅरिसमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने होत आहेत. फ्रँकोइस बायरो यांच्या हकालपट्टीनंतर, अध्यक्ष मॅक्रॉन यांनी त्यांचे जवळचे सहकारी सेबॅस्टियन लेकोर्नू यांची फ्रान्सचे नवे पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली.

गेल्या दोन वर्षात पाच पंतप्रधान बदलण्यात आले आहेत यावरून फ्रान्समधील राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्या राजवटीची अनिश्चितता तुम्हाला समजू शकते. निदर्शनांच्या एक दिवस आधी, पंतप्रधान फ्रँकोइस बायरो यांना अविश्वास प्रस्तावाद्वारे हटवण्यात आले. एका वर्षात हटवले जाणारे हे तिसरे पंतप्रधान होते. आता जनता विचारत आहे की का? राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी मंगळवारीच सेबास्टियन लेकोर्नू यांना नवीन पंतप्रधान म्हणून घोषित केले. पण ते पदभार स्वीकारण्यापूर्वीच जनतेचा संताप रस्त्यावर आला. शेवटी, फ्रान्समध्ये इतक्या अनिश्चिततेचे आणि संतापाचे एकमेव कारण राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन आहेत की दुसरे काही कारण आहे?

२०२२ मध्ये पुन्हा निवडून आल्यानंतर फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन यांच्यावर राजीनामा देण्यासाठी प्रचंड दबाव आहे. बुधवारच्या निषेधातही अशाच मागण्यांचा प्रतिध्वनी आहे. गेल्या तीन वर्षांत फ्रान्समध्ये राष्ट्रपतींच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी अनेक निदर्शने झाली आहेत.२०२३ मध्ये, १७ वर्षीय नाहेल मर्झुकचा दोन पोलिस अधिकाऱ्यांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाल्यानंतर फ्रान्समध्ये देशभर अशांतता आणि दंगली झाल्या. याशिवाय, पेन्शन सुधारणांवर देशभर निदर्शने झाली.

२०२४ मध्ये, फ्रेंच शेतकऱ्यांनी संप केला आणि अन्नधान्याच्या कमी किमती, आणि मर्कोसुरमधील मुक्त व्यापार तसेच डिझेलसाठी राज्य अनुदानात प्रस्तावित कपातीविरोधात निषेध केला. फ्रान्समध्ये वारंवार अशांतता निर्माण होत असताना अध्यक्ष मॅक्रॉन राजीनामा देतील का ? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. राष्ट्राध्यक्षांनी विरोधकांवरही हल्ला चढवला राजीनामा देणार नसल्याचे स्पष्ट केले. फ्रान्सचे गृहमंत्री ब्रुनो रिटेलो यांनी निदर्शनांचा निषेध केला आणि निदर्शक देशात बंडखोरीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. संपूर्ण फ्रान्समध्ये सुमारे ८०,००० सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहेत, त्यापैकी ६,००० पॅरिसमध्ये तैनात आहेत.

## "सेफ स्टेप्स" वरिष्ठ नागरिकांना सक्षम भविष्याकडे नेणारी पावले - डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** कमलनयन बजाज हॉस्पिटल सतत रुग्णांसाठी सामाजिक उपक्रम घेत असतात, याच उपक्रमांतर्गत येथील नर्सिंग कॉलेजच्या ऑडिटोरियम मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सेफ स्टेप्स हा मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. 'सेफ स्टेप्स' हा विशेष उपक्रम ज्येष्ठ नागरिकांना ज्ञान, जागरूकता आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत मार्गदर्शन करून त्यांना अधिक निरोगी व स्वावलंबी भविष्याचा आधार देण्यासाठी समर्पित आहे. तज्ज्ञांनी दिलेले व्याख्यान आणि संवाद सत्रांद्वारे, पडल्यामुळे होणाऱ्या दुखापती टाळणे, हाडांचे आरोग्य, कार्यक्षमता व सक्रिय वृद्धत्व याबाबत व्यावहारिक पावले उचलण्यास शिकविण्याचा प्रयत्न हा या कार्यक्रमाचा उद्देश होता . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उद्घाटनपर भाषणात कमलनयन बजाज हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस आपल्या भाषणात म्हणाले की अधिक सुरक्षित, निरोगी आणि सन्मानजनक वार्धक्य ज्येष्ठ



नागरिकांना मिळावे हीच आमची या कार्यक्रमा मागची प्रमुख भूमिका आहे. यावेळी

जेरियाट्रिक्स, फिजिओथेरपी, ऑर्थोपेडिक्स, स्पोर्ट्स मेडिसिन व रेडिओलॉजी विभागातील तज्ज्ञांनी खूप मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात उपस्थितांच्या शंका, प्रश्न यांचे तज्ज्ञांकडून थेट निरसन केले गेले. कमलनयन बजाज हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांनी नेहमीच कमलनयन बजाज रुग्णालयाला केवळ उपचार केंद्र म्हणून नव्हे तर समाजकल्याण आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे केंद्र म्हणून पाहिले आहे. 'सेफ स्टेप्स' हा उपक्रम त्यांच्या या बांधिलकीचे प्रतीक आहे, ज्याद्वारे जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न असून, विशेषतः आपल्या ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य आणि सन्मानपूर्वक जगण्यावर यामध्ये भर दिला आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जागरूकता निर्माण करणे, वृद्धत्वातील धोके कमी करणे आणि सन्मानपूर्वक वृद्धत्व सुनिश्चित करणे हा आहे. सेफ स्टेप्स हा आमच्या सामाजिक आरोग्य, प्रतिबंधात्मक जागरूकता आणि रुग्ण शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण बांधिलकीचा एक भाग आहे असेही डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांनी सांगितले.

## कोल्हापूरच्या शाही दसरा सोहळ्याला राज्याच्या प्रमुख महोत्सवाचा दर्जा

**ज्योतिर्मय साहित्य**

**कोल्हापूर–** कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, येथील ऐतिहासिक शाही दसरा सोहळ्याला राज्याच्या प्रमुख महोत्सवाचा दर्जा प्राप्त झाला आहे. याबद्दल पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने एक परिपत्रक जारी केले आहे. या विशेष दर्जामुळे, यावर्षी २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राज्य सरकारतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, ज्यामुळे या सोहळ्याला अधिक भव्यता प्राप्त होईल. कोल्हापूरसाठी ही एक अत्यंत आनंदाची आणि मोठी बातमी मानली जात आहे.

मैसूरच्या दसऱ्याप्रमाणेच कोल्हापूरच्या शाही दसरा सोहळ्याला विशेष महत्त्व आहे, जो संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. पूर्वी संस्थान काळात हा दसरा अतिशय उत्साहात साजरा होत असे. जरी त्याचा राजेशाही थाट काही प्रमाणात कमी झाला असला, तरी परंपरा आणि उत्साह आजही कायम आहे. एकेकाळी टेंबलाईवाडी येथील मोकळ्या माळावर होणारा सोने लुटण्याचा सोहळा नंतर दसरा चौकात होऊ लागला.


जुना राजवाडा ते दसरा चौक या मार्गावर निघणारा छबिना, त्याचा भव्य लवाजमा आणि त्याला पाहण्यासाठी जमणारी करवीरकरांची प्रचंड गर्दी हे या शाही दसऱ्याचे खास वैशिष्ट्य आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही भव्य परंपरा जपल्यामुळेच कोल्हापूरचा हा सीमोल्लंघन सोहळा देशभरात चर्चेचा विषय ठरतो.


सध्या शहराच्या मध्यभागी असलेल्या दसरा चौकात, राजर्षी शाहू महाराजांच्या काळात आणि त्यापूर्वी फारशी वस्ती नव्हती. बिंदू चौकाच्या पुढे फक्त एक-दोन वसतिगृहे आणि चित्रदुर्ग मठ एवढीच वस्ती होती. त्यामुळे हा संपूर्ण परिसर मोकळा माळ होता. याच मोकळ्या जागेवर सोने लुटण्याचा सोहळा पार पडत असे. भवानी मंडप ते दसरा चौक असा छबिना लवाजमा घेऊन निघायचा आणि तो पाहण्यासाठी दोन्ही मार्गांवर नागरिकांची मोठी गर्दी जमायची. मावळत्या सूर्याच्या साक्षीने होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यामुळे दसरा चौकात एक वेगळाच उत्साह संचारत असे.










# जात्यावरच्या ओव्या......

लेकीचं लगन
निरोप वैराळाला
लेकी, भाच्या, सुना ,
भर बांगड्या गोताला ||२५३||

लेकीचं लगन
बाक् बुक पोटामंदी
पोटाचा गोळा
लोकांच्या वटीमंदी ||२५४||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# उदरभरण नोहे...





ज्योतिर्मय साहित्य

आज स्पेशल काय आहे असं विचारलं की अक्षरशः वेगवेगळ्या नावांचा पाऊस पडतो. पनीर मेथी, पालक पनीर, आलू पनीर, पनीर टिक्का ... वा वा काय सांगावं. ऐकल्यावर असं वाटतं की आपण आलो ते हॉटेल म्हणजे पनीरची राजधानीच आहे. इतकं विपुल पनीर ! अधूनमधून बातम्या येत असतात की बरचसं पनीर बनावट असतं. एवढं दूध आणि एवढ्या पनीरचं उत्पादन आपल्या देशात होतंच नाही मुळी ! आणि ते अनालॉग पनीर की काय म्हणतात ते स्वस्त मिळतं. घातक पदार्थांपासून बनवलेलं असतं. आरोग्यालाही घातकच ! त्यात ट्रान्स फॅट्स वगैरे असतात म्हणे. आपल्याला काय पनीर मिळाल्याशी मतलब ! असं चापून हाणतो की काही विचारू नका. अस्सल खवैय्ये खाताना कधी विचार करीत नाहीत. ते मधे काहीतरी आलं होतं बघा. वड्यात इतक्या कॅलरीज, सामोस्यात इतक्या... आरोग्याला हानिकारक वगैरे. अस्सल खवैय्ये असल्या गोष्टींकडे लक्ष देत नाही. खाताना विचार करायचा नाही आणि हॉस्पिटलमध्ये जाताना विचार करायचा नाही. काय विचार करायचा तो घरचे बघून घेतील.



तर असो. काही लोकांची मला फार गंमत वाटते. ते हॉटेलमध्ये गेले ना की त्यांना घरच्यासारखं जेवण हवं असतं. अरे बाबा, गेलासच कशाला मग हॉटेलमध्ये ? दुसऱ्या काही मंडळींची तऱ्हा याच्या नेमकी उलट. त्यांना घरी हॉटेलसारखं जेवण हवं असतं. आता घरी ते कसं मिळणार ? मग संघर्ष अटळ ! आम्हाला संघर्ष अजिबात आवडत नाही. त्यामुळे आम्ही आपले घरी कंटाळा आला की अधूनमधून हॉटेलची वाट धरतो. पाऊले चालती पंढरीची वाट... ऐवजी हॉटेलची वाट आमची पावलं चालतात.

परवा एक डॉक्टर मित्र भेटला. म्हणाला, आम्ही बाहेरचं काही खात नाही. पण परवा एका मित्राच्या आग्रहाने एका प्रसिद्ध हॉटेलमधली पावभाजी घरी नेली. तर त्या पावभाजीत कृत्रिम रंग टाकलेला आढळला. मग काय म्हणे मोलकरणीला देऊन टाकली. आता तो मित्र डॉ होता म्हणून त्याने ती पावभाजी खाणे टाळले. पण बाकीचे कितीतरी लोक तिथे मिटक्या मारीत ती खातात.(नंतर ते डॉक्टरकडे जात असतील हा भाग वेगळा.) आता आमच्या गावात तर असा एक भागच आहे. त्याला आपण खाऊ गल्ली म्हणू हवं तर ! तिथे भेळेच्या गाड्या, पाणीपुरीच्या गाड्या, पावभाजी, वडे, पाव वडे आदी चटकदार पदार्थांची रेलचेल असते. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

भाषा आहे. वेदांच्या पेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. कारण वेदांचे सारें रहस्य वेदांतामध्ये प्रगट झालेले आहे.


अशा वेदांताच्या जो तात्पर्यार्थ आहे आणि जो अत्यंत खोल परमार्थ आहे . अतिशय खोल आणि अर्थगंभीर असे जर काही असेल तर तेसद्गुरूंचे वचन होय. त्यावचनाने निश्चित पणे समाधान मिळते. सद्गुरूचे वचन तोच खरा वेदांन्त तोच खरा सिध्दांत होय. ते खरे अनुभवलेले ज्ञान होय. सद्गुरूच्या चरणांशी सतत ‘‘दास‘‘म्हणून राहिले पाहिजे.

स्वतः जर परमात्म स्वरूप आहे आत्मज्ञानाचे सर्वांगाने वर्णनं केले. सद्गुरूशी अनन्य होऊन ते ज्ञान प्राप्त होते व पूर्ण समाधान मिळते.

‘‘अहं ब्रम्हास्मि‘‘ हे महावाक्यांमध्ये सर्व समाधान मिळते.यात गुरू व शिष्य एकरूपहोऊन जातात. शिष्या,या महावाक्यातील मर्म समजून घे. तू स्वत: ब्रम्ह आहेस.यात संशय धरू नकोस. समर्थानी भक्तिचे न ऊ प्रकार सागितलेत। आत्मनिवेदन. हा त्यातला मुख्य प्रकार आहे। विश्व निर्माण होते त्यावेळी ही पंचमहाभूत क्रमाक्रमाने निर्माण होतात पण विश्व अशाश्ववत आहे,त कल्पांताच्या वेळी ते नाश पावते. तेव्हापासून ही पंचमहाभूते ज्या क्रमाने निर्माण होतात,त्याच क्रमाने लय पावतात.

येवढेच नाही तर अखेर उरणारी दोघे. प्रकृती आणि पुरूष ती देखील परब्रम्हात विलीन होतात. जर सर्व द्रुष्यवस्तु नाश पावल्या म्हणजे मी पणाने वावरणारा मी देखील उरत नाही. कारण मुळांतच परमात्मा एकरूप असल्याने दुसरे काही कर्‍ा लागत नाही.

# भगवंताशी एकरूप झाल्यावर सर्व आनंदच आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भक्त झाल्यावर माणूस ज्या आनंदात असतो तो आनंद वर्णन करून समजणार नाही. जिथे दुःखच नाही तिथे आनंद हा शब्द तरी सांगायला कोण असणार ? अनन्य भक्त व्हावे आणि तो आनंद पहावा. भक्ताला सर्वच ठिकाणी आपण आहोत असे दिसते; म्हणजे सर्व चराचर वस्तू तो भगवद्रूपच पहात असतो. एखाद्या खोलीत सर्व बाजूंनी आरसे ठेवलेले असले, तर कुठेही पाहिले तर आपल्याला काय दिसेल ? आपल्या स्वत:शिवाय दुसरे काहीच दिसणार नाही. म्हणजे, सर्व ठिकाणी एकभाव झाला तिथे दुःखाचे कारणच नाही. तिथे सर्वच आनंद असतो. त्याप्रमाणे, भक्त भगवंताशी एकरूप झाला तिथे आनंदाशिवाय दुसरे काय असणार ? जे याप्रमाणे जगात वावरतात, ते आपल्या आनंदात राहूनही इतर लोकांप्रमाणे वागत असतात. तुकारामांनी अशा स्थितीत राहून लोकांना सन्मार्ग दाखविला. समर्थांनीही ती स्थिती सांभाळून सर्व जगाचा व्यवहार केला आणि इतर लोकांना आपल्या पदाला नेले. आपण कधी त्या आनंदाकडे जाण्याचा मार्ग पाहिलेला नाही. म्हणून, ज्यांनी तो आनंद पाहिला आहे आणि जे सदैव त्या आनंदातच रहातात, त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागणे हेच श्रेयस्कर आहे; म्हणजेच गुरुआज्ञेप्रमाणे वागावे. आपल्याला वाटाड्या भेटला म्हणजे त्याच्यावर विश्वास ठेवून आपण चालतो, त्याप्रमाणे गुरूंच्या वचनावर विश्वास ठेवून आपण वागावे म्हणजे आपले हित होते. एखाद्या आंधळ्या माणसाने साखर समजून जर मीठ खाल्ले, तर ते खारट लागल्यावाचून राहणार नाही. त्याप्रमाणे, आनंद मिळेल या कल्पनेने आपण विषयाची संगत धरली, पण त्यापासून दुःखच प्राप्त झाले. पुष्कळ वस्तू मिळाल्या तर त्याने पुष्कळ सुख मिळते असे मानणे हा भ्रम आहे. खरे किंवा पुष्कळ सुख म्हणजे कायमचे, सनातन सुख होय. ते सनातन वस्तूपाशीच, म्हणजे भगवंतापाशीच असते. भगवंताचे आपण झाल्यास सुखी होऊ. तोंड गोड करण्यासाठी जशी साखर खावी लागते, तसे आनंद प्राप्त होण्यासाठी नाम घ्यावे लागते. आपण प्रपंच दुसऱ्याचाच करतो, आपला करीतच नाही. एखाद्या शेतापेक्षा कुंपणालाच जास्त खर्च यावा, त्याप्रमाणे आपण आपल्या मूळ स्वरूपापेक्षा आपल्या उपाधींचीच जास्त आरास करतो. आपण सर्व मिळवतो, पण सर्व ठेवून जावे लागते. आपल्या फायद्याचे केले तरच आपला प्रपंच ; भगवंताचे स्मरण तेवढाच आपला प्रपंच. आपण आईबापांवर, नवराबायकोवर, मुलांवर, नातेवाइकांवर, शेजाऱ्यापाजाऱ्यांवर सुखासाठी अवलंबून राहिलो तर सुखी होणार नाही. आपले दुःख किंवा यातना जर कोणी नाहीशा करीत नाही तर मग दुसरा कोणी आपल्याला सुख देईल ही कल्पना कशी खरी ठरेल ? परमात्म्याचा आनंद अखंड मिळावा, मी त्याचा व्हावे, ही दृष्टी ठेवून नामस्मरण करावे.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा अभंग- भाग चार

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या अवतीभोवतीच्या साऱ्याच वस्तू ,इतकेच काय तर आपली पत्नी मुले नातेवाईक अवती भोवतीची सर्व माणसे यांचा मालक पांडुरंग आहे ,ही भावना दृढ व्हायला हवी. एकदा अंतर व बाह्य मनाचा संघर्ष संपला व दोन्ही मने प्रभु भक्तीत लीन झाली की अंतर्मन हे माऊली होते. म्हणून मन माउली सर्वांची असे म्हटले आहे. असे मन तुमच्या हिताचे व अनहिताचे काय हे ठरवते, व योग्य तेच संकेत देते. मन हे स्वतः गुरु व शिष्यही बनते अंतर्मन हे गुरु झाले पाहिजे व बाह्यमन शिष्य. शिष्य हा नेहमी गुरुची आज्ञा पालन करणारा असतो. त्याप्रमाणे बाह्यमन हे अंतर्मनाचे आज्ञा पालन करणारेच व्हावे. बाह्यमन हे विकारी असते गुरुची आज्ञा शिरसावंद्य त्याने मानावयाला हवी. तशी मालकी अंतर्मनाकडे द्यायला हवी. बाह्यमन आज्ञाधारक व्हावे. यानंतर मालकी आत्म्याकडे व शिष्यत्व अंतर्मनाकडे जायला हवे. अंतर्मन व बाह्य मनात विरोधाभास नको. अंतर्मनाचे दास्यत्व बाह्य मनाने केले पाहिजे. सत्कार्य करण्याचे अंतर्मनाने सांगून बाह्य मनाने ते ऐकणे म्हणजे स्वतःचे दास्य स्वतः केल्यासारखे आहे. दुसऱ्याची सेवा करताना देखील त्याच्यात व माझ्यात एकच प्रभू आहे, त्यामुळे त्याची सेवा म्हणजे स्वतःचे दास्य केल्यासारखे असते. आपल्या सेवेमुळे भगवंत प्रसन्न होतो व ते प्रसन्नत्व पाहून आपण प्रसन्न व्हावे. हे प्रसन्नत्व मिळण्यासाठी इतरांची सेवा केली पाहिजे. दोन्ही मनात संघर्ष म्हणजे अधोगती कडे नेतो व त्याच्यातील ताळमेळ व मधुर संबंध गुरु शिष्य भाव हा गती कडे नेतो. तुका म्हणे मना नित्य नवा अंकुश या मनावर सतत आत्म्याचा अंकुश हवा. मन हे स्वतः सतत विकार संघर्ष असंतोष निर्माण करत असेल तर नर्क समोर आहे हे समजा.

ही बाब केवळ सामान्य वाचकां साठीच नव्हे तर भक्त, साधक यांसाठी सुद्धा लागू आहे. मनाच्या मृत्यूसाठी तयार व्हायला हवे. हे बलिदान प्रेमातून ध्येय वादातून मिळू शकते. दोन मनाच्या संघर्षातून नव्हे. माझे मरण पाहिले मी डोळा याचा अर्थ मनाचा मृत्यू म्हणजे समाधी.

माणसे शरीराने जवळ व मनाने दूर झालेली आहेत. कारण मनात संघर्ष आहे. बाह्य मनाला अंतर्मनावर प्रेम करायला लावायला हवे. म्हणून तू मन हे मीच करी असे म्हटले आहे. याशिवाय रूण झुण रुणुझुणु रे भ्रमरा याही अभंगातून हेच सांगितले आहे.

मनात प्रेम भाव वृद्धिंगत व्हावा म्हणून आपल्या संतांनी अनेक विविध प्रयोग दिले आहेत तुलसीदासजी म्हणतात सियाराम स्वरूप सब जग जानी करहू प्रणाम जोड जूग पानी. आपल्या अवतीभवती दिसणारे सर्व जीव ,भूत मात्र यांना सीता माता आणि प्रभू रामचंद्र या रूपात पहा. त्यांना विनम्रतेने अभिवादन करा. असे करत गेले की ,सर्व भूत मात्र हे ईश्वराचे रूप आहेत हा भाव मनात दृढ व्हायला लागतो व सर्व चरा चरावर प्रेम निर्माण व्हायला लागते. असे प्रेम निर्माण झाले की आपल्या मनातही प्रेमाचा डोह वृद्धिंगत होतो.

संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांनी हा मनाच्या प्रसन्नता का आवश्यक आहे हे सांगणारा हा एक उत्कृष्ट असा अभंग आपणास दिला आहे .

यानिमित्ताने हाअभंग केवळ वाचन किंवा श्रवण करून कृत कृतार्थ मानणे यापेक्षा मनाला प्रसन्न करण्यासाठी, त्यावरील ताण कमी करण्यासाठी, यात सुचविलेले प्रयोग कसोशीने करायला हवेत.

हे प्रयोग आपण सर्व जन करूयात व जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या चरणावर दंडवत घालूयात.

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई
एकनाथ नामदेव तुकाराम
क्रमशः...
माझ्या समर्थ सद्गुरूंच्या ज्ञानगंगेतील अमृतधारा
जय हरी माऊली!

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**नृपः साधुर्मुनेः पुत्रो नारायणो हि षष्ठमः।**
**लोकैर्वन्द्यः सुरैर्वन्द्यो धर्मवीरो जितेन्द्रियः।।३७।।**

नृप, साधु, मुनिपुत्र, नारायणाचा सहावा अवतार, लोकवंद्य, देववंद्य, धर्मवीर, जितेंद्रिय असा तो आहे.

**चिरञ्जीवो महात्यागी विचक्षणो यशोधनः।**
**महाबलः सधेनुश्च सर्वभूतहिते रतः।।३८।।**

चिरंजीव, महात्यागी, विचक्षण, यशोधन, महाबली, धेनुसहित असणारा तो परशुराम सर्व भूतांच्या हितामध्ये रत असणारा आहे.

**अनासक्तः शिवप्रियो दानशूरो जनप्रियः।**
**वायुवेगः खलं हन्ता नरवीरः सनातनः।।३९।।**

तो अनासक्त आहे. शिवप्रिय आहे. दानशूर आहे. लोकप्रिय आहे. वायुवेग आहे. दुष्टनिर्दालक आहे. नरवीर व सनातन आहे.

**धनुर्धरः सदापूज्यः पृष्ठबाणश्च सज्जनः।**
**भीष्मस्यापि च कर्णस्य गुरुरूपेण संस्थितः।।४०।।**

धनुर्धर, सदापूज्य, पाठीवर बाण असणारा सज्जन, भीष्म व कर्णाच्याही गुरुरूपात प्रतिष्ठित आहेत.

# आरोग्य संजीवनी



## बेलफळांचा वापर आयुर्वेदिक औषधांमध्ये भरपूर केला जातो.

ज्योतिर्मय साहित्य

तसेच या झाडाची पाने, फुले, झाडाची साल व खोडाचा गाभा याचाही आयुर्वेदिक औषधी म्हणून उपयोग करता येतो. बेलाचे झाड हे वातावरण शुद्धीकरणाचे कार्य करते.

बेलाची पाने रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त मानली जातात. यामध्ये रेचक गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळतात. जे पुरेसे इन्सुलिन तयार करण्यात मदत करतात. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. आयुर्वेदाचार्यांशी सल्लामसलत केल्यानंतर ते सेवन केले जाऊ शकते.

पोट साफ होते

बद्धकोष्ठतेची समस्या असल्यास वेलाची पाने खावीत. बेलची पाने थोडे मीठ आणि मिरपूड चघळल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. ही पाने आतड्यांमधून विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात, असेही म्हटंले जाते.

पचनक्रिया चांगली राहते

बेल पोट साफ करण्याचे काम करते. यात रेचक गुणधर्म आहेत जे पाचन तंत्र मजबूत करतात. तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर बेल किंवा बेलची पाने खाऊ शकता. परंतु ती प्रमाणात खाणे गरजेतचे आहे.

मधुमेहाच्या रुग्णांसाठी

बेल अतिशय फायदेशीर आहे. दिवसातून दोन वेळा बेलाच्या पानांचा रस पिल्यास मधुमेहापासून मुक्तता मिळविणे शक्य होऊ शकते. शरीराच्या वजनानुसार बेल फळाचा अर्क घेतल्यास त्याचा परिणाम दिसून येतो. कारण कौमारीन नावाचा घटक बेल फळामध्ये असल्यामुळे इन्सुलिन निर्माण करण्यासाठी बीटा पेशीला उत्तेजित करतो.

अतिसार विरोधी

उन्हाळ्याच्या दिवसात अतिसार ही समस्या आता अधिकांश लोकांमध्ये दिसून येते. अलीकडे या रुग्णांचे प्रमाण वाढीस लागले आहेत. या परिस्थितीत उलट्या, हगवण, मळमळ वाटू लागते. बेलाच्या पाण्यात साखर मिसळून प्यायल्यास याचे लाभ दिसून येतात. किंवा कच्चे फळे खाल्यास अतिसार नियंत्रणामध्ये येतो. अर्धे पिकलेली फळ हे सर्वोत्तम मानले जाते परंतु संपूर्ण पिकलेली फळे किंवा अगदी फळाचा चूर्ण परिणामकारक परिणाम दर्शवितो.

रक्तक्षयविरोधी

बदलत्या जीवनशैलीत अनेकांना रक्ताच्या कमरतेचे लक्षण दिसून येतात. अशा परिस्थितीत वाळलेल्या बेलाच्या गराचा चूर्ण तयार करा. तो चुर्ण गरम दुधात रोज एक चमचा टाका आणि प्या. यामळे शरीरात नवीन रक्त तयार होण्यास सुरुवात होते.

ऊन लागल्यास

जागतीक तापमानवाढीमुळे दरवर्षी उन्हाळ्यात तापमानचा पार वाढतो. दरवर्षीचा हा अनुभव असल्याने अनेकांना ऊन लागते. हा त्रास सुरू झाल्यास बेलाच्या ताज्या पानांना कुटून मेहंदीप्रमाणे तळपायावर लावावे. अशा वेळी बेलाचा शरबत प्यायल्यास तत्काळ आराम मिळतो.

बेल फळाच्या लगद्यामध्ये स्टिरॉइड्स, कूमारिन्स, फ्लॅनोनोयड्स, टरपेनॉईड, फिनोलॉलिक संयुगे, लिग्निन, इनुलीन, आणि अन्य एंटिऑक्सिडेंट जी आपल्याला जुनाट रोगांपासून वाचवू शकतात. याव्यतिरिक्त, त्यात प्रथिने, कर्बोदके, खनिजे (कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह) आणि जीवनसत्वे (विट ए, विट बी, विट सी आणि रिबोफॅव्हिन) यांचा समावेश आहे. ॲल्कॉइड, कार्डियाक ग्लायकोसाइड आणि फ्लॅनोनोयड्स इत्यादीचा उत्तम स्त्रोत आहे. बेलफळ हे स्थानिक पारंपारिक औषधांसाठी वापरले जाणाऱ्या महत्वाच्या झाडांपैकी एक आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# ॥ श्री राम कथा ॥




ज्योतिर्मय साहित्य

लक्ष्मण म्हणे तुम्ही आपलपोटे वाटतात. राम म्हणे आपण व रावण युद्ध करतान ते राक्षस आपल्या बाणांनी मेले त्यावेळी त्यांचे तोंड माझ्या कडे होते त्यामुळे ते राक्षस असून मुक्त आधीच झाले.पण वाणाराचे तोंड राक्षसाचे होते. ते मेले ते त्यांचे तोंड पाहून मेले म्हणून नरकात जातील म्हणून यांना अमृत पाक असे सांगितले. हा प्रसंग अद्भुत रामायणात आला आहे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

युद्ध चालू असताना एकदा रावणा इ साइटचे मायाक प्रेत समोर आणून टाकले.हनुमान म्हणे हे शक्य नाही.देवाचा खरा भक्त देवाच्या विरहात कधी मारत नाही आणि मेला तर तो खरा भक्त नाही. म्हणून सीता मारू शकत नाही.

चक्रवाक व चक्रवाकी यांचा संवाद.

रामाणी शाप दिला तुझा पत्नी पासून वियोग होईल.ती म्हणे यांना बोलायचे कळत नाही.माझे तरी तुमच्याबद्दल करून भाव होताना. ती म्हणे हे चुकले मग मला का शिक्षा.राम म्हणाले तुला उशाप दिला तुम्ही दिवस व्हायरल रात्री नाही.रात्री ते आरडा ओरडा करतात.

सरस पक्ष व त्याची पत्नी बरोबर विरह झाला की मरण जातात. संताची पत्नीजीला लक्ष्मणा असेही नाव आहे. एकदा लक्ष्मणा चक्रवाकीला म्हणाली तुम्ही वेगळे होऊन कसे जगू शकता? ती म्हणे आमचे प्रेम उत्कट आहे. चक्रवाकी म्हणे अगं वियोगात सुद्धा प्राण टिकवून ठेवणे तुला काय कळणार नाही. हनुमान म्हणे सीता त्यांचे प्राण तुमचे दर्शन होईस्तोवर जाणार नाहीत. **(क्रमशः)**

# माधव गडकरींचे अग्रलेख आठवावे असा... ‘‘धडक-बेधडक‘‘


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

‘‘धडक बेधडक‘‘ हा घनश्याम पाटील यांचा लेखसंग्रह. चपराक प्रकाशनाने तो प्रकाशित केला आहे. पाटील यांचे या आधी ‘‘दखलपात्र व ‘‘दरवळ‘‘ हे दोन संग्रहांचेही वाचकांनी मोठ्या प्रमाणावर स्वागत केले आहे. गेल्या २३ वर्षापासून ते पूर्णवेळ पत्रकारिता क्षेत्रात आहेत. तरुण भारत, केसरी, या वर्तमानपत्रापासून त्यांच्या पत्रकारितेचा प्रारंभ झाला. निर्भीड पत्रकारिते करीता ‘‘स्वर्गीय माधवराव गडकरी पत्रकारिता पुरस्कार‘‘ त्यांना मिळाला आहे. माधवराव गडकरी यांच्याप्रमाणेच घनश्याम पाटील हे बेधडक आणि निर्भीडपणे विचार मांडताहेत हे सांगायला नको. या लेखसंग्रहात एकूण २२ लेख आहेत. जगाला हेवा वाटावा अशी सेटलमेंट मला करायची आहे -राज ठाकरे, सर्व काही किंवा काहीही- शरद पवार, शिवसेनेची आयडियालाँजी कोणती ?, राष्ट्रवादीची बोलकी बाहुली- सुप्रिया सुळे, यांच्या राजकीय प्रवासावरील लेख यात आहेत. तसेच संसद दुबळी करणार का?, व्यवस्थेची एक्सपायरी डेट,, विधान परिषद बरखास्त करा, आवाजाची नाही तर सभागृहाची उंची वाढवा, नाकर्ती घराणी नाकारा, भ्रष्टपणाची एजंटगिरी, मनोहरी नौटंकी, हा तर महाराष्ट्राचा अपमान, असे परखड लेख या संग्रहात आपल्याला वाचायला मिळतात. त्या त्या वेळच्या परिस्थितीवर त्यांनी आपल्या लेखात आपले विचार व्यक्त केले आहेत.भाष्य केले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेपासून राज ठाकरे यांनी सतत भूमिका बदलली आहे. फक्त उत्कृष्ट वकृत्व ही गोष्ट नेतृत्वाला पुरेशी नाही.ज्यांना स्वतःला भीती वाटते ती व्यक्ती नेतृत्व करू शकत नाही. लोकांना फक्त विकासाची ब्लू प्रिंट देऊन चालत नाही तर ती स्वप्न सत्यात आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतात सतत जनतेत मिसळून त्यांचे सुखदुःख,प्रश्न समजून घ्यावे लागतात. दुसऱ्याच्या नकला करणे म्हणजे पक्ष चालवले नाही. एक चांगला नेता चांगला मराठी माणूस महाराष्ट्रातल्या नव्या पिढीला अपेक्षित आहे.ईश्वरी कृपेने आपल्याकडे वकृत्व आहे तेव्हा या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे अशी भावना लेखात व्यक्त केली आहे. आपण बघतो लाखोच्या संख्येने सभांना गर्दी असते पण हजाराच्या संख्येने ते मतात परावर्तित होत आहेत

शरद पवार यांच्या राजकारणात प्रवेशाला चार तपे उलटून गेली आहेत.३८ व्या वर्षी महाराष्ट्राचे ते मुख्यमंत्री झाले. अनेक महत्त्वाचे खाती सांभाळले. तरी पण ते पंतप्रधान पदापर्यंत पोहोचू शकले नाहीत न झालेले सर्वोत्तम पंतप्रधान असे त्यांना म्हटले जाते. यशवंतराव चव्हाण यांच्या सोबत त्यांनी राजकारणात प्रवेश केला परंतु शेवटपर्यंत ते त्याच्या सोबत राहिले नाही. शरद पवाराच्या भोवती कधी चांगले लोक जमलेत असे चित्र नाही. चांगली टीम गोळा करायची त्यांच्याकडून चांगलं काम करून घ्यायचं हे त्यांना कधीच जमल नाही. शरद पवारांनी वसंतदादा पाटील यांच्या पाठीत खंजीर खुपसला, वसंत दादांना राजकारणातून बाजूला करण्यासाठी डाव त्यांनी साधला त्यानंतर पवारांची विश्वासार्हता जी लयाला गेली ती अजूनही त्यांना मिळवता आली नाही, असे त्यांनी स्पष्ट मत मांडले आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्याकडे एक विचार होता एक संस्कार होता त्यांचे ‘‘कृष्णाकाठ‘‘ हे आत्मचरित्र वाचताना त्यातला निर्मळपणा प्रामाणिकपणा मनावर बिंबतो.




तर लोक माझे सांगाती वाचताना पवारांच्या अशा असंख्य उठाठेवीच डोळ्यासमोर येतात. गेल्या साठ वर्षाचा विचार करता पवाराच्या राजकारणातले सर्व प्रकारचे दोष ठळकपणे दिसून येतात. लबाड, स्वार्थी, घराण्याच्या निर्माण करणार हे नेतृत्व आहे. जातीयवाद आणि विशेषतः ब्राह्मण द्वेष अनेकदा दिसून येतो। महाराष्ट्राच्या राजकारणात लक्षात राहतील अशा कोणत्याही गोष्टी त्यांनी महाराष्ट्राला दिले आहे




असे दिसत नाही.छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्यासाठी त्यांनी काही केलं नाही, की महाराष्ट्राचा भविष्यकाळ घडवण्याचा व्हिजन त्यांनी कधी महाराष्ट्रा दिले नाही.

शिवसेनेत घराणेशाही राहणार नाही जातीधर्माच्या पलीकडे जाऊन पक्ष उभा करु हा विचार बाळासाहेबांना अभिप्रेत होता परंतु उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या पर्यंत शिवसेना बदलली. मराठी माणूस आणि त्याचा स्वाभिमान यासाठी स्थापना झाली होती मराठी माणसाला मोठा करण्याचे स्वप्न बघत हा पक्ष स्थापन झाला आणि तरुणाची एक मोठी फळी उभी राहिली. परंतु या दुर्लक्ष करत सेनेने घराणे मोठे केले. शिवसेना त्याच्या स्वतःच्या नेत्यांनी मोठे होऊ देत नाही. उद्धव ठाकरे यांचे एखादे अभ्यासपूर्ण भाषण कधी गाजले का? तसेच बाळासाहेबांनी अनेकांवर टीका केली ती तरी त्यांच्या लक्षात आहे का? असा प्रश्न त्यांनी केलेला आहे. शिवसेना आता विसर्जन करण्याची वेळ आलेली आहे असा विचार व्यक्त केला होता आज परिस्थिती आपल्यासमोर आहे.

राष्ट्रवादीची बोलकी बाहुली हा सुप्रिया सुळे यांच्या राजकीय कारकीर्दि वरील लेख. शरद पवारांना भेटायला येणाऱ्या लोकांबरोबर फोटो काढून घ्यायचे आणि ते ट्विटर, फेसबुकवर, इंस्टाग्राम वर अपलोड करायचे यापेक्षा त्यांचं सामाजिक कार्य आहे का? एखाद्या वक्त्याकडे सहज सभा जिंकण्याचे कौशल्य असावे लागते तेही त्यांच्याकडे नाही. राजकारण म्हणजे संधी असते त्या संधीच सोनं करायचं ही ती मातीमोल ठरवायची हे ज्याचं त्याचं त्यांनी ठरवायचं असतं. अधिकार गेले की शब्दशः कोणीच विचारत नाही. त्यामुळे शरद पवारांबरोबर पुढची काही वर्ष तुम्ही टिकून राहू शकाल पण ते शाश्वत नसेल. महापुरुषही काळासोबत कसे नष्ट होतात याबाबत त्यांनी राय कीणीकरांचे एक निरीक्षण नोंदवले तेवढे दोन ओळी समजून घेण्या एवढ्या आपण समर्थ आहात असे ते म्हणतात

कोरुन शिळेवर जन्म मृत्यूची वार्ता

जा ठेवा त्या जागेवर पणती आता

वाचेल कोणीतरी होताना उत्खनन

म्हणतील कोण हा कशास याचेच स्मरण

विधानपरिषद बरखास्त करा हा लेख विचार करायला लावणारा आहे. कारण विधान परिषदेमध्ये खूप काही साध्य होते अशातला भाग नाही. काही लोकांची वर्णी लावणे, असंतुष्ट लोकांना संतुष्ट करण्यासाठी विधान परिषदेचा उपयोग केला जातो, हे सर्वश्रुत आहे.

कला साहित्य क्रीडा कृषी वैद्यकीय क्षेत्रातील लोकांचा यात समावेश किती होतो? आणि ते काय कार्य करतात.?


सुबह सुबह की बात है, संसद दुबळी करणार का ?मनोहरी नौटंकी, हा यशवंत मनोहर यांचे पुरस्कार नाकारणारी भूमिका, लिहिलेले काही विशेष लेख आहेत. आवाजाची नव्हे तर सभागृहाची उंची वाढवा, या लेखात ते म्हणतात विधिमंडळ हे महाराष्ट्रातल्या १२ कोटी जनतेच्या प्रश्नाचं आणि अशा आकांक्षाचा प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. महत्वाचे प्रश्न हाताळण्या ऐवजी,टिकाटिप्पण्या,आरोपप्रत्यारोप करण्यातच सभागृहाचा वेळ जातो. अधिवेशन बंद करा आणि त्या ठिकाणी मनोरंजनाचे कार्यक्रम करा निदान जनतेला तुमच्याकडून अपेक्षाभंगाचे दुःख होणार नाही या शब्दात त्यांनी सभागृहाविषयी लिहिले आहे.

घनश्याम पाटील आपल्य मनोगतच म्हणतात एखाद्या घटनेविषयी किंवा प्रसंगा विषयी किंवा भूमिके विषयी जर कोणी स्पष्ट विचार मांडले तर विचार मांडणाऱ्यांना धमक्या देण्याचा प्रकार करत असाल तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि इथल्या संतांच्या विचारांचा तुम्हाला विसर पडला आहे आणि त्यांचं नाव घ्यायचा तुम्हाला अधिकार नाही अशा शब्दात ते आपल्या भावना व्यक्त करतात.

एखाद्या व्यक्तीचा लेखन आवडलं नाही म्हणून त्याच्याशी वैचारिक वाद आणि प्रतिवाद करा पण आम्ही त्यांना बघून घेऊ, मारू धमक्या देऊ, तुमच्याशी मारामारीच करू असं तुम्हाला वाटत असेल तर या देशातल्या निवडणुकां बंद करून टाका.अशा प्रवृत्ती जर वर येत असतील तर त्यांना थांबवण्याची जबाबदारी इथल्या प्रत्येक सुजाण नागरिकाची आहे आपण ज्या वेळेला छत्रपती शिवाजी महाराज शाहू फुले आंबेडकरांचे नाव घेतो तेव्हा एका स्वप्न आपल्या डोळ्यासमोर असतो आज असलेली एकूण परिस्थिती लक्षात घेता उद्याच्या पिढीचा उज्वल भवितव्याचा विचार करायचा वर्तमानाची कठोर चिकित्सा करणे आवश्यक आहे म्हणून म्हणून राजकीय परिस्थिती भाष्य करणे मला गरजेचे वाटते आणि म्हणून मी ते केले. प्रेम वाढीस लागावे हा माझ्या लेखणीचा मूळ मंत्र आहे. यातील टीका कुणाचे आकसापोटी नाही.तर पत्रकार म्हणून तटस्थपणे मला जे दिसले ते मांडण्याचा प्रयत्न आहे. त्यातील सकारात्मक भाग समजून घेतला तर उद्याच्या उज्वल भवितव्यासाठी तो पोषक ठरणार आहे. शेवटच्या मनावर जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या अभंग ओळी सूचक आहेत.

सुजाण वाचकांनी हा संग्रह जरुर वाचावा.

धडक बेधडक.(लेखसंग्रह )
घनश्याम पाटील.
चपराक प्रकशन.पुणे.
मुल्य.३००/-
संपर्क..७०५७२९२०९२










# या कातरवेळी...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


कातर म्हणजे अस्थिर किंवा कमी होणारी गोष्ट. सूर्यास्त झाल्यानंतर सूर्य प्रकाश कमी होतो. म्हणून ही कातरवेळ. आपले कवी पण किती हुशार होते. त्यांनी ही वेळ व त्यावेळची असलेली मनस्थिती काव्यात गुंफली आहे. जसे मानवी मनाचा एकटेपणा वर्णन करणारे गीत, ‘‘या कातरवेळी पाहिजेस तू जवळी‘‘

दिवस व रात्र यांच्या मधील काळ म्हणून संधिकाळ. व त्या वरील गीते. ‘‘संधिकाळी या अशा धुंदल्या दिशा दिशा‘‘.

ही वेळ उन्हे उतरणे, सूर्य मावळणे आणि संधीप्रकाश पडणे या तीन सांज मिळून तिन्ही सांजा या तिन्ही सांजा लक्षात घेऊन तिन्ही सांजा सखे मिळाल्या असे म्हणत सखीला वचन दिले आहे.

तर पत्नी ‘‘झाल्या तिन्ही सांजा‘‘ म्हणत साज शृंगार करुन पतीची वाट बघत आहे. हीच वेळ कुणाला गाई वासरांच्या परतण्याची सावळ्याची सावली वाटते. आणि ‘‘सांज ये गोकुळी‘‘ सारखे गाणे तयार होते. ही वेळ संध्याकाळची विविध रूपे घेऊन येते. खरे तर ती वेळ, तो सूर्य, संधीप्रकाश सर्वत्र एकच असतो. पण प्रत्येकाच्या मनस्थिती प्रमाणे संध्याकाळ प्रत्येकाला वेगळी भासते.

याच वेळी घरात दिवेलागण होऊन ‘‘शुभंकरोती‘‘ म्हंटले जाते. लक्ष्मीला आवाहन केले जाते. अंगणात दिवा लावला जातो. उदबत्तीचा सुगंध दरवळतो. जणू मरगळ, उदासीनता प्रार्थना करुन दूर केली जाते.



एकाच वेळेची इतकी रूपे आणि विविध भावभावना असतात. या मागेही विज्ञान आहे. आपल्या शरीराचे एक दैनंदिन घड्याळ असते. आपले शरीर सर्केडियन लयीला प्रतिसाद देत असते. या वेळी शरीरात मेलाटोनीन संप्रेरक तयार व्हायला सुरुवात झालेली असते. ते तंद्री आणते आणि झोपेसाठी आपले शरीर तयार करते. पण आपली झोपेची वेळ झालेली नसते. म्हणून या वेळी बरेचदा उदास, एकटे, चिंताजनक वाटणे, हुरहूर वाटणे अशा भावना निर्माण होतात. प्रत्येकाची त्या भावनांना प्रतिसाद देण्याची, विचार करण्याची पद्धत वेगळी असते.

त्यामुळे प्रत्येकाच्या मनात विविध भावभावना निर्माण होत असतात. दिवसभर काम करुन शरीर दमलेले असते.आणि आपल्या विसाव्याच्या ठिकाणी जायला आतुर झालेले असते. हा प्रत्येकाचा विसावा भिन्न असतो. म्हणूनच आपल्याला विविध मूड असलेली सांजवेळची गाणी लाभली आहेत.

काही कवींनी ही वेळ थेट उतार वयाशी जोडली आहे. पण त्यातूनही ‘‘मधुघट‘‘ सारखे उत्तम काव्य निर्माण केले आहे. हे उतारवय पण असेच असते. कर्तव्याची पूर्तता झालेली असते. जरा स्थिरता आलेली असते. पैलतीर दिसू लागलेला असतो.



मुले बाळे आपल्या विश्वात रमलेली असतात. कधी कधी आपली गरज कोणाला आहे का? असेही वाटून जाते. पण याच वेळी भोवती नातवंडे असतील तर उदास विचार दूर होतात. आणि आपले बाल्य त्यात गवसते.

आपले पूर्वज किती हुशार होते याचा आपण नेहेमी अनुभव घेतो. या सगळ्या भिन्न भावभावना नष्ट व्हाव्यात आणि चांगले विचार मनात यावेत या साठी यावेळी घरातील सर्वांनी एकत्र येऊन दिवा लावणे, काही स्तोत्रे म्हणणे. एकत्र वेळ घालवणे यातून सर्वांचीच मनस्थिती बदलते. आणि घराला घरपण येते. दमलेल्या, एकाकी वाटणाऱ्या मनाला उभारी देते. माझी कोणीतरी वाट बघत आहे ही भावना खूप महत्वाची असते. म्हणूनच ही वेळ सर्वांनी घरी परतण्याची असते.

म्हणूनच असे वाटते, ‘‘ये शाम मसतांनी‘‘ आणि कोणीतरी खेचल्या प्रमाणे घराकडे पावले ओढली जातात. अशी विविध रंगाने नटलेली ‘‘संध्याकाळ‘‘ आपण लोभस, सुंदर आणि हवीहवीशी करु या. आणि त्या नंतर येणाऱ्या व तनमनाला विश्रांती देणाऱ्या रात्रीचे स्वागत करु या. रात्र शांत झोपेची गेली तर उद्याचा उष:काल प्रसन्न होतो.

***

# अष्टविनायक विकास आराखडा पर्यटनवाढीसह महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला बळ देईल-उपमुख्यमंत्री अजित पवार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई** – महाराष्ट्रासह देशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायकांच्या मंदिर परिसरात सुरु असणारी विकासाची कामे वेळेत व दर्जेदार पध्दतीने पूर्ण करण्यात यावीत. या विकास आराखड्यांतर्गत काम करताना मंदिरांच्या मूळ आराखड्याला कोणताही धक्का न लावता प्रत्येक कामाला ‘हेरिटेज टच’ द्यावा. श्री अष्टविनायक मंदिर विकास आराखडा भाविकांना दर्जेदार सोयी देण्याबरोबरच महाराष्ट्रातील पर्यटनवाढीसह अर्थव्यवस्थेला नवे बळ देणारा ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

श्री अष्टविनायक मंदिर परिसर विकास आराखडा कामांची आढावा बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात झाली. यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ राजेश देशमुख, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय, मुंबईचे संचालक तेजस गर्गे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय, पुणेचे सहायक संचालक विलास वाहणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातील अष्टविनायकांपैकी मयुरेश्वर (मोरगाव), चिंतामणी गणपती (थेऊर), विघ्नेश्वर (ओझर), महागणपती (रांजणगाव), वरदविनायक (महड), सिद्धिविनायक (सिद्धटेक) आणि बल्लाळेश्वर (पाली) या मंदिरांच्या परिसरात सुरु असणारी विकासाची कामे वेळेत व दर्जेदार पध्दतीने करण्यात यावीत. मंदिराच्या मूळ आराखड्याला कोणताही धक्का न लावता काम करण्यात यावे. अष्टविनायक मंदिर परिसरात राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना पर्यायी जागा देऊन त्यांचे योग्य पुनर्वसन करण्यात यावे, मंदिर परिसरात अधिक मोकळी जागा उपलब्ध करावी. मूळ मंदिराशी विसंगत ठरणारी परिसरातील बांधकामे काढून टाकून आपत्कालीन स्थितीत मंदिर परिसरात ॲम्ब्युलन्ससह अग्निशमन गाड्या सहज जाऊ शकतील अशी मार्गव्यवस्था ठेवण्यात यावी. पर्यटनाच्या दृष्टीने महाराष्ट्राला प्रचंड संधी असून पर्यटनाची अर्थव्यवस्था उभी करण्यासाठी ठोस पावले उचलण्यावर भर द्यावा. केरळ, ओडिशा यांसारख्या राज्यांच्या धर्तीवर विदेशी पर्यटक, परराज्यातील भाविक आणि नवी पिढीला आकर्षित करण्यासाठी आधुनिक सोयीसुविधा, उच्च दर्जाच्या सेवा व पर्यटनाभिमुख उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

# ती रम्य सायंकाळ...



**ज्योतिर्मय साहित्य**

....आणि सर्रकन उडालेली धूळ वाटा वाटानी पांगली. गरगर फिरणारी गाडीची चाके वाऱ्याच्या वेगाने पुढे जात होती. अन् बाजूने मागे मागे जाणारी झाडे हातून सुटलेल्या क्षणात हरवत चालली होती. आणि या साऱ्यात एक अनामिक नजर दूरच्या त्या वाटेवर स्थिरावली....!! का? किती? कुठे? कसे, माहीत नाही की आणखी काय...! परतीच्या वाटेवर चालताना मागे वळून पाहताना मन ओलेचिंब झाले. सांज वेळच्या सावलीसारखे डोन्ट से गुड बाय बोलता बोलता भविष्याच्या चाहुलीत बुडाले..!! मानवी मनच ते तेंव्हा, त्यादिवशी आपण...,

अन् नजरेसमोर आला तो अस्ताला चाललेला रविराज निशेच्या मांडीवर विसावला होता. आकाशात घराच्या ओढीने जाणारे ते थवे भुर्रकन उडून जात होते. नदीच्या पाण्याला अन् दूर... डोंगरातल्या झाडांना आलेली शितलाई म्हणजे जणू अपूर्व संगममच होता ...!! ... गिरीराज्याच्या कडेला आलेली लाली संधी कालात बुडू पाहत होती. थोड्याच वेळात निशेने आपले पंख पसरवून धरती वर काळी शाल पांघरली.

दिवस आपल्याला मागे टाकून कसा निघून जातो ना ! मनाची ती चलबिचल अन् असे किती क्षण मागे वळून पाहताना निघून गेलेले ते दिवस कसे निघून गेले ना..! शैशत्वाचे नेनतपण जपता जपता कळलेच नाही केव्हा चाळीशीच्या उंबरठ्यावर विसावले. जबाबदारीच्या जाणिवेने प्रौढत्व विविध रंग ल्याले. का सोडून द्यायचे क्षण सारे भारावलेले. क्षण पळे पळणारच, निसर्गनियम आहे. विचारी मना ग्लास अर्धा भरल्यापेक्षा अर्धा ग्लास रिकामा तू पाहे. भरलेला ग्लास पाहताना आपले त्या रिकाम्या ग्लासाकडे आपले लक्ष जात नाही. यातून फक्त एकच की बोलायचे की कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोण सकारात्मक हवा. आज कित्येक दिवसांनी जणू मोकळा श्वास घेताना तो आनंद ते स्नेहबंध आत्मियता, प्रेम, माया, खरया अर्थाने स्नेह मेळावा म्हणावा असे. कुठेतरी मनात असलेली तेवढ्याच आवेगात नजरेसमोर आले ते पाठीवर नि खांद्यावर ठेवलेले हात नि मग सारे बंध जणू मोकळे होत गेले.

माहित नसते कोण कोणासाठी चुकून पडतात ऋणानुबंधाच्या गाठी. जीवनाच्या वाटेवर चालत असताना कित्येक वाटा मागे टाकत आपण पुढच्या वाटेवर मार्गस्थ झालेले असतो. त्या अनवट वाटा तुडवत विचारांचा तोच तोच सारखेपणा एक ठराविक विचार सरणी साचेबद्धपणा या साऱ्यातून जेंव्हा आपण स्वतःला बाहेर काढतो. तेंव्हा बाहेर पडल्यानंतर माणसे माणसाला ओळखू शकतात. असे मला वाटते. प्रेमळ मनाने केलेली विचारपूस पाठीवर फिरलेला तो हात, ते हळवे बंध अन् त्या हळव्या बंधातून नात्याची झालेली एक गुंतवणूक कितीतरी शक्ती देऊन जाते.अनबंध असतात नाही असे नाही.पण म्हणून माणूस म्हणून बघताना चा तो दृष्टीकोण अश्या स्नेहबंधात नाही बदलला तर नवल ते काय!! खरचं माणसाच्या आयुष्याचे विविध पैलू असतात. जे जसे समोर असते. ते तसे नसते.हे आपले आपण समजून घ्यायला हवे. माणूस म्हणून नाही तर व्यक्तिमत्त्व म्हणून प्रत्येकाच्या आत एक चांगलं व्यक्तिमत्त्व असतेच असते. माणूस म्हणून त्याच्याकडे बघण्याचा पैलू बदलला तर तेंव्हा खरया अर्थाने त्याचा आनंद आपण घेऊ शकतो. आनंद अगदी निखळ आनंद, धकाधकीच्या जीवनात माणूस निखळ आनंद हरवत चालला आहे. जबाबदारीची जाणीवअन् बरच काही यातून बाहेर पडल्यानंतर याचा अर्थ अगदी स्वैराचार असा नाही.पण छोट्या छोट्या गोष्टीतून ही निखळ आनंद मिळत असतो. ताण तणाव असतात आणि असणारच. पण या सर्वातून थोडा वेळ काढून पुढच्या कर्तव्यासाठी एका नव्या ऊर्जेने प्रत्येकाने उभे राहिले पाहिजे.अन् हिच ऊर्जा....!!

अन् नजरेसमोर आली ती रम्य सायंकाळ तो थंड गार वारा मंद वाऱ्याची झुळूक ते नदीच्या पाण्यातील काठावर उडणारे ते तुषार, भल्या मोठ्या सागरकिनारी विसवणारा तो एक थेंब खळखळून किती काही सांगून जातो. त्यासोबतच सायंकाळी लुकलुकणारे ते रंगबिरंगी दिवे अन् गवताच्या पात्या पात्यात सामावलेला तो प्रकाश त्या कॅरमच्या सोंगट्या, चेसच्या पटावरील हत्ती, घोडे ,उंट, राजा, राणी, वजीर अन् ते खेळीमेळीचे वातावरण, अन् मनमोकळ्या गप्पा मन एका सकारात्मक विचारांनी प्रेरित झालेले मन प्रफुल्लित झाल्याशिवाय राहणार नाही. भारावलेली ती एक रम्य सायंकाळ सकाळच्या प्रकाश वाटा शोधीत काळाच्या वेळेत लुप्त होत जातच असते. दुःखाची अनेक कारणे असतात.पण आपण आनंदाची कारणे शोधायची असतात. असे मला वाटते.

सुटलेल्या ते क्षण अन् त्यातून मिळालेला तो आनंद नवी ऊर्जा प्रेरणा देऊन गेला. ती रम्य सायंकाळ.. प्रकाशाच्या नव्या वाटा शोधीत सकारात्मक तेच्या मार्गावर मार्गस्थ झाली. त्या प्रत्येक क्षणाचा आनंद ओंजळीत समावताना त्या कातर वेळेच्या स्मृती जसे धरित्रीने पांघरलेल्या सोनेरी काठ असलेल्या काळया रंगाच्या शालीमधून उद्या नवी किरणे होऊन नव्या वाटेवर मार्गस्थ होताना..!




# नाट्य लेखक-दिग्दर्शक संतोष पवारांनी साधला नाट्यतंत्राबाबत विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** प्रसिद्ध नाट्य लेखक, अभिनेता आणि दिग्दर्शक संतोष पवार यांनी गुरुवार, ११ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कला सादरीकरण (नाट्यशास्त्र) विभागास भेट देवून नियोजित अभिनय-दिग्दर्शन कार्यशाळेत शिक्षकांसह विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधून सुलभ भाषेत नाट्यतंत्र उलगडून सांगितले.

नाट्य लेखन, अभिनय आणि दिग्दर्शनासह नाट्य निर्मितीच्या संपूर्ण प्रक्रियेबद्दल विद्यार्थ्यांना तालमीच्या सप्रयोगासह प्रसंग बसवण्याची तसेच चित्रपटातील संवाद कौशल्य यावर संतोष पवार यांनी विद्यार्थ्यांना तपशिलासह माहिती दिली. एवढेच नव्हे तर एकूणच नाट्य निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया पवार यांनी विद्यार्थ्यांना सोदाहरण स्पष्ट केली. यासाठी अभिनय, लेखक, दिग्दर्शनातील बारकावे पवार यांनी साध्या भाषेत समजावून सांगितले.

संतोष पवार यांनी गाजलेले फु बाई फु, यदाकदाचित, हिच फॅमिलीची गंमत आहे, नवरा माझा नवसाचा आदी अनेक चित्रपटांत भूमिका साकारल्या आहेत. विभागातील सर्व विद्यार्थ्यांना नाटकाच्या निर्मितीच्या प्रक्रियेबदल सविस्तर मार्गदर्शन केल्याची माहिती कला सादरीकरण (नाट्यशास्त्र) विभागप्रमुख प्रा. डॉ. वैशाली बोदेले यांनी दिली. संतोष पवार म्हणाले, माझी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कला सादरीकरण विभागात येण्याची खूप दिवसांची इच्छा पूर्ण झाली. नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधताना मलाही निखळ आनंद मिळाला. विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेत कलात्मक दृष्टीने प्रत्येक गोष्टीवर पवार यांनी समर्पक उत्तरे दिली. एवढेच नव्हे तर प्रत्येक विद्यार्थ्याचे त्यांनी समाधान केले. यावेळी दिग्दर्शक संतोष पवार यांनी द लास्ट बॅटल आणि बुजगावणं एकांकिकेतील कलाकार व दिग्दर्शकांना सविस्तर मार्गदर्शनही केले.

डॉ. वैशाली बोदेले यांनी प्रास्ताविकातून संतोष पवार यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करून परिचय करून दिला. प्रा. डॉ. स्मिता साबळे, प्रा. डॉ. गजानन दांडगे तसेच इतर प्राध्यापक आणि कर्मचारीवर्ग देखील यावेळी उपस्थित होता.





# श्री नागेश्वर विद्यालय भाग शाळा चिखली पुणे येथे संगणक कक्षाचे उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी मुंबई (प्रदीप बडदे) –** ऍटॉस कंपनीच्या माध्यमातून मंगळवार दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी श्री नागेश्वर विद्यालय भागशाळा चिखली पुणे येथे संगितमय वातावरणात समारंभ सुरू झाला. पाहुण्यांचे स्वागत ढोल ताशाच्या गजरात करण्यात आले. चव्हाण सर व विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर करून पाहुण्यांचे स्वागत केले. बोरचटे सर यांनी प्रास्ताविक केले. सौ.पाटील मॅडम यांनी संगणक कक्षाची माहिती इंग्रजी स्पिच मधून सादर केली. सदर प्रसंगी प्राचार्य सानप सर यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्याना आजच्या काळात अधुनिक पध्दतीच्या ज्ञानाची अवश्यकता कंपनीच्या मदतीने पुर्ण करता येईल. विद्यार्थ्यांना त्याचा कसा फायदा घेता येईल याचे महत्व सांगितले. कंपनीचे फ्रेडरिक ऑब्रिएर अटोस ग्रुपचे मुख्य माहिती अधिकारी ()यांनी या प्रसंगी मार्गदर्शन केले. रमेश रामचंद्रन, दिलीप नाईकवाडी, विनोद आहुजा (आयटी जिओग्राफीज -भारत प्रमुख ) नागेश चव्हाण, हरजीतसिंह बारडा, श्रीनिवास बास्सा, सुकुमार आनंदन, सुदर्शन चेल्लप्पा, प्रसाद म्हात्रे इत्यादी कंपन्यांचे मान्यवर उपस्थित होते. संगणक कक्षाच्या निर्मितीसाठी विशेष सहकार्य सुशिल शिंगाडे, केशव कुलथे यांचे झाले. सौ घरबुडे मॅडम, सौ क्षीरसागर मॅडम, सौ अत्रे मॅडम, श्री.वारघडे सर, खराडे सर यांनी कार्यक्रम नियोजनात योगदान दिले. बुर्डे मामा. रमेश कसबे यांनी कार्यक्रम व्यवस्था पाहिली. उद्घाटन कार्यक्रम पर्यवेक्षिका सौ. पंडित, एस.आर. मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सौ बुरुड मॅडम यांनी सूत्रसंचलन केले.

# मराठी विद्यार्थ्यांनी रशियात सादर केल्या लोककला



**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् ने आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचा लोककलेचा सांस्कृतिक ठसा उमटवला आहे. रशियातील व्लादिमिर येथे झालेल्या गोल्डन रिंग इंटरनॅशनल फोल्कलोर फेस्टिव्हल मध्ये विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र व आसाम येथील लोकनृत्य प्रकार लावणी, गोंधळ, बिहू व भोरताल सादर केले.

भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली व रशियाच्या सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या निमंत्रणावरून या महोत्सवात सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांनी दाद दिली. या आंतरराष्ट्रीय महोत्सवात भारतासह तब्बल १० देशांतील संघांनी सहभाग नोंदवला. भारती विद्यापीठाचे स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् मधील १० विद्यार्थी व संचालक प्राध्यापक प्रा. शारंगधर साठे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, प्र-कुलगुरू डॉ. विश्वजीत कदम व कुलगुरू डॉ. विवेक सावजी यांनी अभिनंदन केले.

प्रा. शारंगधर साठे म्हणाले, भारतीय लोककलेच्या परंपरेकडे जगभरात आदराने पाहिले जाते. आंतरराष्ट्रीय महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व विद्यार्थ्यांनी केले. विद्यार्थ्यांनी मेहनत, सराव आणि जिद्दीने उत्कृष्ट सादरीकरण करून भारताची मान उंचावली आहे. जागतिक मंचावर आपल्या लोकनृत्यांना इतका मोठा प्रतिसाद मिळणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.

लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रीक्ट ३२३४ डि -२ आणि सहभागी क्लब्स यांच्या वतीने "शिक्षक दिन गौरव सोहळा" १३ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम पुणे विद्यार्थी गृह(अरण्येश्वर ) च्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे.यावर्षीचा "लायन्स जीवन गौरव पुरस्कार" प्रख्यात समाजसेवक विजय फळणीकर यांना प्रदान करण्यात येणार असून या सोहळ्याला यशदाचे अतिरिक्त महासंचालक डॉ. शेखर गायकवाड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. गेल्या वीस वर्षांपासून सातत्याने साजरा होत असलेला हा सोहळा विद्यार्थ्यांच्या घडणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा गौरव करणारा आहे. संगीत, योग, क्रीडा, साहित्य, कला, शास्त्र, समाजसेवा तसेच विशेष विद्यार्थ्यांसाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांचा या कार्यक्रमात सन्मान केला जाणार आहे.

# युवा साहित्य व नाट्य संमेलनामुळे चांगले साहित्यिक, सांस्कृतिक वातावरण होईल, स्वागताध्यक्ष डॉ. भालेराव यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय साहित्य**

**अहिल्यानगर–** मसापचे राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलन आपल्या अहिल्यानगर शहरात होणे हे अभिमानास्पद आहे. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी सर्व स्तरातून संयोजन समिती उत्कृष्ट नियोजन करत आहे. शहरातील सांस्कृतिक, साहित्यिक वातावरण वाढण्यासाठी असे उपक्रम उपयुक्त असतात. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात कार्यक्रमांची रेलचेल आहे. नगरकरांसाठी ही अनोखी मेजवानी आहे. संमेलनामुळे शहरात चांगले साहित्यिक व सांस्कृतिक वातावरण होईल, असे प्रतिपादन या संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यांनी केले. अहिल्यानगर मसापच्या सावेडी उपनगर शाखा व न्यू आर्टस् महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ सप्टेंबरला होणाऱ्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या नियोजनाची बैठक न्यू आर्टस् महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या



बैठकीत संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. भालेराव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संमेलनाचे निमंत्रक जयंत येलूलकर, सावेडी उपनगर शाखेच्या स्नेहल उपाध्ये, सुरेश चव्हाण, नंदकिशोर आढाव, बाळकृष्ण गोटीपामुल, अश्विनी जठार, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ संजय कळमकर, अनिल आठरे व कल्पना दारकुंडे, मराठी विभागप्रमुख लक्ष्मीकांत येळवंडे, नाट्यशास्त्र विभागप्रमुख बापू चंदनशिवे, मच्छिंद्र मालुंजकर आदींसह प्राध्यापक व मसापच्या शाखेचे सदस्य उपस्थित होते. प्राचार्य सागडे म्हणाले, जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे भाग्य आहे की येथे हे राज्यस्तरीय संमेलन होत आहे. या संमेलनामुळे संस्थेची वेगळी ओळख निर्मण होऊन युवा विद्यार्थ्यांमध्ये मराठी वाचन, लेखन व साहित्या विषयी आवड निर्माण होणार आहे. नवे साहित्यिक निर्माण होण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त आहे. सूत्रसंचालन प्रा.गणेश भगत यांनी, तर आभार उपप्राचार्य डॉ संजय कळमकर यांनी मानले. यावेळी राजेंद्र जाधव, गणेश निमसे, भरत होळकर, सुनिता मोटे, दत्तात्रेय नकुलवाड, नितीन दुधाडे, प्रा डॉ. अशोक गायकवाड आदी प्राध्यापक उपस्थित होते. राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या बैठकीत मार्गदर्शन करताना संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव. समवेत प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे, जयंत येलूलकर, सुरेश चव्हाण, उपप्राचार्य डॉ संजय कळमकर आदी. हे साहित्य संमेलन यशाच्या शिखरावर जाणार : येलूलकर सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली या संमेलांचे उत्कृष्ट नियोजन केले जात आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.प्रशांत भालेराव हे अर्थ व समाजिक क्षेत्रात राज्यात नावाजलेले सुसंस्कृत व्यक्तिमत्व आहे. यांच्या नेतृत्वाखाली हे संमेलन यशाच्या शिखरावर जाणार आहे, असा विश्वास संमेलनाचे निमंत्रक जयंत येलूलकर यांनी व्यक्त केला.

**हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)** E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559